मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरीची वाहतूक कोंडी फुटणार!

## पिंपरी, रहाटणी, काळेवाडी मार्ग सुसाट : पिंपरी डेअरी फार्म उड्डाणपुलाचे 55 टक्के काम पुर्ण

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने डेअरी फार्म येथे उड्डाणपूल बांधण्याचे काम सध्या प्रगतीपथावर असून आतापर्यंत या प्रकल्पाचे ५५ टक्के काम पूर्ण झाले आहे. या पूलाचे काम पूर्ण झाल्यानंतर पिंपरी व परिसरातील नागरिकांसाठी प्रवास अधिक सोयीस्कर होईल आणि वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होण्यासाठी मदत होणार आहे.

पिंपरी डेअरी फार्म येथील उड्डाणपूल प्रकल्पाच्या कामाला मार्च २०२३ मध्ये कार्यादेश देण्यात आला होता. मात्र, या पुलाच्या बांधणीसाठी काही वृक्ष अडथळा ठरत असल्याने कामास विलंब झाला. महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण समितीकडे एप्रिल २०२३ मध्ये वृक्ष तोड व पुनर्रोपणासाठी सादर केलेल्या प्रस्तावास ऑगस्ट २०२३ मध्ये मंजुरी मिळाली. पुलाच्या जागेत अडथळा ठरणारे १४२ वृक्ष काढण्यात आले तर ६४ वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात आले. मंजूर आराखड्यातील जागेतील काही वृक्ष संरक्षण विभागाच्या हद्दीत असल्याने त्यांचे मूल्यांकन करून संरक्षण विभागाची परवानगी घ्यावी लागली. वन विभागाने सप्टेंबर २०२३मध्ये मूल्यांकन पूर्ण केले आणि अखेर मार्च २०२४ मध्ये वृक्ष तोडीस परवानगी मिळाल्यानंतर मे २०२४ मध्ये १४२ वृक्ष काढण्यात आले. तसेच नोव्हेंबर २०२४ मध्ये संरक्षण मंत्रालयाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ६४ वृक्षांचे पुनर्रोपण करण्यात आले.

हा पूल रेल्वे विभागाशी संलग्न असल्याने विविध मंजुरी प्रक्रियांमध्ये देखील विलंब झाला. रेल्वे विभागाच्या ओव्हर हेड इक्युपमेंट (ओएचई) व इतर संरचना बदलण्यासाठी आवश्यक मंजुरी व निधी हस्तांतरणाची प्रक्रिया सध्या सुरू आहे. या कामासाठी रेल्वे विभागाने ७४.८९ लाख इतक्या आगाऊ रकमेची मागणी केली असून, त्याची प्रक्रिया पुर्ण करून रक्कम अदा केली आहे. सद्यस्थितीत रेल्वे विभागाच्या मंजुरीसाठी अंतिम टप्प्यात प्रक्रिया सुरू आहे. सध्या सर्व विभागांचा समन्वय साधून आता काम वेगाने सुरू करण्यात आले आहे.



### वाहनचालकांना मिळणार दिलासा

» पिंपरी डेअरी फार्म येथील लोहमार्गावर उभारण्यात येणाऱ्या पुलामुळे विना अडथळा वाहतुकीस चालना मिळणार आहे. यामुळे नोकरी, व्यवसाय किंवा अन्य कामांसाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांचा वेळ वाचणार आहे. हा पूल खुला झाल्यानंतर पिंपरीतील डेअरी फार्म, पिंपळे सौदागर, रहाटणी, काळेवाडी आणि पिंपरी गावातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. याशिवाय या प्रकल्पामुळे नागरिकांना सुविधा, सुरक्षितता आणि इंधन बचतीच्या दृष्टीने फायदा होणार असून पुणे मुंबई महामार्गावर तसेच तुकाराम नगर मेट्रो स्टेशनपर्यंत जलद आणि सहज पद्धतीने प्रवास करण्यासाठी मदत होणार आहे.

---

# गुढी पाडवा शोभा यात्रेत हजारो हिंदू बांधवांचा उत्स्फूर्त सहभाग

## ‘उद्योग सुविधा कक्षा’मुळे स्थानिक गुंतवणूक आणि औद्योगिक विकासाला वेग मिळेल

**पिंपरी | प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज की जय !, जय श्रीराम !, प्रभू श्रीराम चंद्र की जय !, भारत माता की जय ! अशा घोषणा.. भगवे झेंडे, डोक्यात परिधान केलेल्या भगव्या टोप्या आणि नागरिकांचा शिगेला पोहोचलेला उत्साह अशा भारलेल्या वातावरणात मोशी येथे गुढीपाडव्यानिमित्त शोभायात्रा पार पडली. त्यात विशेष आकर्षण ठरले महिलांचे झांज पथक, ढोल ताशा पथक. शोभा यात्रेच्या निमित्ताने परिसरातील नागरिकांनी पारंपरिक वेशभूषा धारण करून सहभाग घेतला. मोटारसायकलसह हजारो नागरिक सहभागी झाले होते. महिलाही मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या.

भाजपाचे प्रखर हिंदूत्वववादी नेते आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने गुढीपाडव्यानिमित्त ही शोभायात्रा पार पडली. रविवारी (दि.३०) मोशी येथील वूड्स विले सोसायटी पासून सकाळी 7 वाजता शोभायात्रेला सुरुवात झाली. शिवरस्ता ते स्वराज रेसिडेन्सी चौक या मार्गाने शोभायात्रा मार्गस्थ झाली. शोभा यात्रेमध्ये महिलांचे झांज पथक, ढोल ताशा पथक तसेच महिलांचा मर्दानी खेळ मुख्य आकर्षण ठरले.

"छत्रपती शिवाजी महाराज की जय !, जय श्रीराम !, प्रभू श्रीराम चंद्र की जय !, भारत माता की जय ! अशा घोषणा देत शोभायात्रा निश्चित करण्यात आलेल्या मार्गाने मार्गस्थ होत होती. ठिकठिकाणी शोभा यात्रेत प्रभु श्रीराम, लक्ष्मण व सिता मातेची वेशभूषा धारण करून चिमुकल्यांनी देखील सहभाग घेतला. शोभा यात्रेचे ठिकठिकाणी पुष्पवृष्टी करून स्वागत करण्यात आले. अत्यंत उत्साहाच्या वातावरणात शोभा यात्रा पार पडली.

नियोजनबद्ध पद्धतीने काढण्यात आलेल्या शोभा यात्रेला सकाळी दहाच्या दरम्यान सुरुवात झाली. सर्व दुचाकी वाहनांना भगवे ध्वज लावण्यात आले होते. प्रत्येकाने डोक्यावर भगवा फेटा तसेच भगव्या रंगाच्या टोप्या परिधान केल्या होत्या. तसेच पारंपारिक वेषभूषा केली होती. लहान मुले, महिला, युवक, तरुण व ज्येष्ठ नागरिकही या शोभायात्रेत सहभागी झाले होते.



> “ भारतीय पारंपरिक सणांना मागील काही वर्षांपासून आधुनिकतेचा स्पर्श झाला आहे. हिंदू व भारतीय सणांची वैभवशाली परंपरा आणि संस्कृतीचे महत्त्व नव्या पिढीला समजावे यासाठी मागील काही वर्षांपासून गुढीपाडवा व मराठी नववर्षाच्या पार्श्वभूमीवर भव्य शोभायात्रेचे आयोजन करत आहे. आज या शोभा यात्रेमध्ये महिला भगिनींचा प्रतिसाद वाढलेला दिसून आला. युवा वर्ग स्वयंस्फूर्तीने शोभायात्रेत सहभागी झाले होते. आपली संस्कृती आणि परंपरा आपण जपली पाहिजे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

# पुणे विमानतळावरून प्रवाशांच्या संख्येत 11 टक्क्यांनी वाढ

## सध्या साधारण 36 शहरांसाठी विमान सेवा सुरु : दिवसाला 30 हजारांपेक्षा जास्त प्रवासी

**पुणे | प्रतिनिधी**

लोहगाव येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावरील उन्हाळी हंगामाची स्लॉट उपलब्ध झाल्याने उन्हाळी हंगाम सुरू झाला आहे. मात्र, उन्हाळी हंगामामध्ये नवीन ठिकाणी विमान सेवा सुरू झाली नाही. गेल्या वेळेच्या उपलब्ध असलेल्या १०९ स्लॉटपैकी दिवसाला १०४ विमानांची उड्डाणे होते आहेत. सोयी-सुविधा वाढल्याने नव्या टर्मिनलवरून प्रवास करणाऱ्यांच्या संख्येत ११ टक्क्यांनी वाढ झाली आहे.



लोहगाव आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उन्हाळी हंगामात १०९ स्लॉट देण्यात आले आहेत. त्यापैकी १०४ स्लॉटचा सध्या वापर होत आहे. पुणे विमानतळावरून सर्वाधिक विमाने दिल्ली शहरांसाठी उड्डाण करतात. पुण्यातून दिवसाला साधारण २० पेक्षा जास्त उड्डाणे दिल्लीला होतात. तर, तेवढीच विमाने पुण्याला येतात. पुण्यातून आंतरराष्ट्रीय प्रवासासाठी दिल्लीला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त आहे. त्यामुळे पुण्यातून सर्वाधिक उड्डाणे दिल्लीला होत आहेत. त्यानंतर बंगळुरूला दिवसाला १५ उड्डाणे होतात. तर, तेवढीच उड्डाणे बंगळुरू येथून पुण्याला होत आहेत. पुणे व बंगळुरू आयटी सिटी असल्यामुळे कामानिमित्ताने प्रवास करणाऱ्यांची संख्या मोठी आहे. पुणे विमानतळाला उपलब्ध असलेल्या स्लॉटचा विमान कंपन्यांना जास्तीत जास्त वापर करण्यासाठी सूचित केले असून, त्यामुळे प्रवाशांना त्यामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

### पुण्यातून 36 शहरांसाठी सेवा

» पुण्यातून सध्या साधारण ३६ शहरांसाठी विमान सेवा सुरू आहे. त्यामध्ये तीन आंतरराष्ट्रीय विमान सेवा असून, सिंगापूर, बँकॉक आणि दुबई या देशांचा समावेश आहे. दुबईसाठी दोन विमान सेवा सुरू आहेत. उन्हाळी हंगामामध्ये आंतरराष्ट्रीय विमान सेवेसह देशांतर्गत विमानांची संख्या वाढतील अशी अपेक्षा होती. परंतु, यामध्ये कोणतेही वाढ झालेली नाही.

> उन्हाळी हंगामासाठी पुण्याला १०९ स्लॉट मिळाले आहेत. यामुळे प्रवाशांना सोयीचे होणार आहे. शिवाय पुण्यातून देशांतर्गत ३६ आणि आंतरराष्ट्रीय तीन ठिकाणी प्रवाशांची सुविधा उपलब्ध होणार आहे. त्याचा प्रवाशांना फायदा होणार आहे.
>
> **- संतोष डोके, पुणे विमानतळ.**

### दिवसाला ३० हजारांपेक्षा जास्त प्रवासी

पुणे विमानतळावरील नवीन टर्मिनल सुरू झाल्यानंतर प्रवाशांच्या सोयी-सुविधांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे प्रवास करणाऱ्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असून, सध्या ११ टक्क्यांनी प्रवाशांच्या संख्येत वाढ झाली आहे. यामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला आहे. सध्या विमानतळावरून दिवसाला जवळपास ३० हजारांपेक्षा जास्त प्रवासी प्रवास करत आहेत.

---

# आंबेगावमध्ये बजरंग दलाची 'रेकॉर्ड ब्रेक' शोभायात्रा

## आमदार महेश लांडगे यांचे भाषण गाजले : 'सोशल मीडिया'वर हिंदुत्ववाद्यांचा धुरळा

**पिंपरी | प्रतिनिधी**

'देश की रक्षा कौन करेगा..', जय श्रीराम.. जय शिवराय... अशा गगनभेदी घोषणा देत "हिंदू माता-भगिनींकडे वाकड्या नजरेने बघणाऱ्या प्रवृत्ती या पुढील काळात मान खाली घालून गेल्या पाहिजेत. असा हिंदूत्वाचा आवाज करारा पाहिजे, असा हुंकार प्रखर हिंदत्वाचा पुरस्कार करणारे भाजपाचे आमदार महेश लांडगे दिली. पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठी शोभायात्रा म्हणून 'सोशल मीडिया'वर हिंदूत्ववादी तरुणांनी धुरळा उडवून दिला आहे.






हिंदू नववर्ष गुढीपाडवा या निमित्ताने विश्व हिंदू परिषद, बजरंग दल प्रखड व सर्व सलग्न संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने पश्चिम महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या हिंदू नववर्ष शोभा यात्रेचे आयोजन मंचर तालुका आंबेगाव येथे करण्यात आले होते. या शोभा यात्रेस सुमारे 30 हजार हिंदू बांधव आणि भगिनींनी सहभाग घेतला. या शोभायात्रेत आमदार लांडगे यांना निमंत्रित केले होते.

मंचर येथील बाजारपेठेतील श्रीराम मंदिर येथून शोभायात्रेला सुरूवात करण्यात आली. महाआरती करुन शोभायात्रेने प्रस्थान केले. या शोभायात्रेचे यंदा २१ वे वर्ष आहे. परंपरेनुसार ध्वज पूजन, शस्त्र पूजा करून शोभा यात्रेला सुरुवात करण्यात आली. चावडी चौक, धर्मवीर संभाजी महाराज चौक, पिंपळगाव फाटा, धर्मवीर चंद्रशेखर आण्णा बाणखेले मार्गावरुन छत्रपती शिवाजी महाराज चौकात यात्रेचा समारोप करण्यात आला. विश्व हिंदू परिषद मंचर प्रखंड मंत्री अक्षय जगदाळे, बजरंग दल मंचर प्रखंड संयोजक सागर भोर आणि सहकाऱ्यांनी शोभायात्रेच्या यशस्वीतेसाठी पुढाकार घेतला.

> विश्व हिंदू परिषद, बजरंग दल मंचर प्रखंड आणि हिंदूत्ववादी संघटनाच्या माध्यमातून अभूतपूर्व अशी शोभायात्रा, रथयात्रा काढण्यात आली. तरुणांचा प्रचंड उत्साह आणि ऊर्जा अलौकीक पहायला मिळाली. देव-देश-धर्म रक्षणाचा विचार तरुण पिढीमध्ये रुजला पाहिजे. आधुनिक युगाशी स्पर्धा करताना आपली भारतीय संस्कृती- परंपरा याचेही जतन झाले पाहिजे. गुढी पाडव्याच्या निमित्ताने झालेली शोभायात्रा संस्मरणीय आणि नवी ऊर्जा देणारी आहे.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा.**

शोभायात्रेमध्ये घोड्यावर विराजमान त्यावर विराजमान छत्रपती श्री शिवाजी महाराज, मावळे सगळ्यांचे लक्ष वेधून घेत होते. हिंदू धर्मात सर्वात आधी पूजेचा मान असणाऱ्या श्री गणरायाचा चित्ररथ, भगवान शंकराचा नंदीवर विराजमान चित्ररथ होते तर छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती मूर्ती आणि संविधान चित्ररथ बालवानर सेना, बजरंग बलीची पूर्णाकृती मूर्ती, धर्मवीर चंद्रशेखर आण्णाचा स्मृतिरथ विशेष लक्षणीय होता.

योगी शंकराची भव्य मूर्ती, अयोध्यातील प्रभू श्रीराम मूर्ती, श्रीरामभक्त हनुमान मूर्ती यासह छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजी महाराज यांचे चित्ररथ आणि त्यावर केलेले विद्युत रोषणाई आणि त्या मूर्ती समोरून नृत्य करत सर्वांसाठी आकर्षणाचा विषय ठरले. या शोभायात्रेत ठिकठिकाणी मर्दानी खेळ आकर्षण ठरले.

# रोग झाल्यावर धूरफवारणी करणार का?

## डासांच्या त्रासामुळे जनसंवाद सभेत नागरिकांच्या तक्रारी, हत्ती रोगासहीत इतर रोगांचा वाढला धोका

**पिंपरी | प्रतिनिधी**

हत्तीरोग हा डास चावल्याने जंतुसंसर्गामुळे होणारा रोग आहे. हत्तीरोग झालेल्या रुग्णाच्या पायाला खूप जास्त सूज येते, ज्यामुळे पायाचा आकार बदलतो आणि पाय विद्रूप झालेला दिसून येतो. 'क्युलेक्स' प्रजातीच्या डासापासून हत्तीरोग पसरतो.

हत्तीरोग हा डास चावल्याने जंतुसंसर्गामुळे होणारा रोग आहे. हत्तीरोग झालेल्या रुग्णाच्या पायाला खूप जास्त सूज येते, ज्यामुळे पायाचा आकार बदलतो आणि पाय विद्रूप झालेला दिसून येतो. 'क्युलेक्स' प्रजातीच्या डासापासून हत्तीरोग पसरतो. शहरातील अनेक भागात मच्छरांची संख्या वाढली आहे. अनेकदा जनसंवाद सभेत नागरिकांच्या तक्रारी येत आहेत. तरीही धूर फवारणी होताना दिसत नाही. त्यामुळे रोग झाल्यावर धूरफवारणी करणार का, असा सवाल नागरिकातून विचारला जात आहे.

क्युलेक्स डास हत्तीरोगास कारणीभूत 'बुचेरिया बॅनक्रॉफ्टिया' या परजिवी जंतूंचा प्रसार करतात. प्रौढावस्थेमध्ये हत्तीरोगाचे जंतू लसिका संस्थेच्या वाहिन्यांमध्ये राहतात. लसिका संस्था ही लसिकाग्रंथी आणि लसिका वाहिन्यांची बनलेली यंत्रणा असून, ती शरीरातील रोगप्रतिकारशक्ती अबाधित ठेवते. हत्तीरोगाच्या जंतूंनी शरीरात प्रवेश केल्यानंतर लक्षणे दिसून येण्यासाठी ८ ते १६ महिने लागत असल्याची माहिती तज्ज्ञांनी दिली.

दरम्यान, शहराच्या अनेक भागात वेळेवर धूरफवारणी होत नाही. स्वच्छतेकडे कोणी लक्ष देत नाही. त्यामुळे काही भागातकचऱ्याचे ढिगारे आढळून येतात. आता धूरफवारणीही होत नाही. त्यामुळे मच्छराची संख्या वाढत असून नदीकाठ अनेक भागात धूर फवारणी करण्याची मागणी वारंवार होत आहे. याकडे आरोग्य विभागाने दुर्लक्ष केले आहे.



### या डासांची उत्पत्ती कुठे?

» क्युलेक्स प्रजातीचे डास दूषित पाणी आणि घाणीच्या जागी मोठ्या प्रमाणात वाढतात. हे डास बांधकाम मजुरांची घरे, पडक्या इमारती, नाल्यांच्या बाजूला असणारी घरे या ठिकाणी आढळून येतात.

### हत्तीरोग कसा पसरतो ?

» डास चावल्यामुळे हत्तीरोग होतो. क्युलेक्स प्रजातीचे डास हत्तीरोगासाठी कारणीभूत 'बुचेरिया बॅनक्रॉफ्टिया' या परजिवी जंतूंचे वाहक असतात. हा परजिवी वाहक डास मनुष्याला चावल्यानंतर हत्तीरोगाचे जंतू माणसाच्या शरीरात सोडतो. माणसाच्या शरीरात हे जंतू चावलेल्या ठिकाणाहून किंवा अन्य ठिकाणाहून त्वचेतून शरीरात प्रवेश करतात. हत्तीरोगाच्या जंतूने शरीरात प्रवेश केल्यानंतर ८ ते १० महिन्यांनंतर त्याची लक्षणे दिसून येतात.

### ही आहेत लक्षणे

» जंतू : शरीरात शिरकाव केल्यानंतर या आजाराची लक्षणे दिसून येतात. लक्षणविरहित किंवा वाहक अवस्थेमध्ये रुग्णाच्या रात्री घेतलेल्या रक्ताच्या नमुन्यात मायक्रो फायलेरिया आढळून येतात.

### तीव्र लक्षणे

» अवस्थेत ताप येतो
» लसिकाग्रंथींचा दाह सुरू होतो.
» लसिकाग्रंथींना सूज येते. पुरुषांमध्ये वृषणदाह सुरू होतो.
» हात, पाय आणि बाह्य जननेंद्रियांमध्ये सूज येते.

# महापालिकेच्या सहा कोटींच्या मोबाईल कॉम्पॅक्टर रॅक खरेदीत भांडार विभागाच्या अधिकाऱ्यांचा सावळागोंधळ सुरु असल्याचा आरोप

## एकाच कंपनीला डोळ्यासमोर ठेवून राबवली निविदा प्रक्रिया; उत्पादन करत नसतानाही इतर कंपन्यांचा प्रक्रियेत समावेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने विविध विभागाचे अभिलेख सुस्थितीत ठेवण्यासाठी भांडार विभागाकडून सहा कोटी रुपयांच्या मोबाईल कॉम्पॅक्टर रॅक खरेदी करण्यात येत आहेत. मात्र, या निविदा प्रक्रियेत नामांकित एमएनसी ब्रँड असणाऱ्या मे. हर्मन मिलर, मे.स्टीलकेस आणि गोदरेज या तीन ब्रँडच्या उत्पादित कंपनी अथवा त्यांच्या वितरकांनाच सहभागी होण्याची संधी देण्याची अट घातली आहे. त्यामुळे या खरेदीत गोलमाल असल्याची शंका जागरूक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

मुळात गोदरेज कंपनी सोडली तर मे. हर्मन मिलर आणि मे. स्टील केस या दोन्ही कंपन्या परदेशी असून मोबाइल कॉम्पॅक्टर सिस्टीम हे साहित्य बनवण्याचे काम करत नाहीत. तसेच त्या साहित्याचे उत्पादनदेखील करत नाहीत. त्यामुळे एकाच कंपनीला डोळ्यासमोर ठेवून निविदा प्रक्रिया राबवली जात आहे. इतर कंपन्यांना निविदेत सहभागी होता येऊ नये, यासाठी जाचक अटी-शर्ती टाकून प्रक्रिया राबवली गेली आहे. यामुळे सहा कोटींच्या मोबाइल कॉम्पॅक्टर रॅक खरेदीत भांडार विभागाच्या अधिकाऱ्यांचा सावळागोंधळ सुरु असल्याचा आरोप होत आहे.

महापालिकेच्या भांडार विभागाने मोबाईल कॉम्पॅक्टर रॅकचा साहित्याचा पुरवठा करण्यासाठी ई निविदा सूचना क्र. ६३/२०२५-२६ ही १२ मार्च २०२५ ते २ एप्रिल २०२५ या कालावधीत प्रसिद्ध केली. सुमारे ६ कोटी ६ लाख रुपयांची निविदा काढण्यात आली. या निविदेत नामांकित एमएनसी ब्रँड असणाऱ्या मे. हर्मन मिलर, मे.स्टीलकेस आणि गोदरेज या तीन ब्रँडच्या उत्पादित कंपनी, त्याचे वितरक यांना सहभागी होण्याची संधी देण्याची अट सदर निविदा प्रक्रियेत टाकली आहे. मोबाईल कॉम्पॅक्टर रॅकचे उत्पादन गोदरेज कंपनी सोडली तर मे. हर्मन मिलर आणि स्टीलकेस या दोन कंपन्या करत नाहीत.



### निविदेसाठी 22 कंपन्यांचा सहभाग

» यापूर्वी महापालिकेने मोबाईल कॉम्पॅक्टर रॅक पुरवठा करण्याची ई निविदा काढली होती. सदर निविदेमध्ये कोणत्याही प्रकारच्या अटी-शर्ती नमूद केल्या नव्हत्या. त्या प्रक्रियेत २२-२३ कंपन्या सहभागी होऊन निविदा ४० टक्के कमी दराने जाऊन संबंधित कंपनीने काम केले होते. परंतु यावेळच्या निविदेबाबत जाचक अटी-शर्ती टाकून कमीत-कमी स्पर्धा व्हावी, या दृष्टिकोनातून ही प्रक्रिया राबवली जात आहे. यामुळे चांगल्या कंपन्यांना निविदेत सहभागी होता येत नाही. परिणामी महापालिकेचे आर्थिक नुकसान होऊन पैशाचा अपव्यय होण्याची दाट शक्यता आहे

> मोबाईल कॉम्पॅक्टर रॅक खरेदी करण्यासाठी निविदा प्रक्रिया राबवली आहे. सुमारे सहा कोटी रुपयांची खरेदी करण्यात येत आहे. विविध विभागाने केलेल्या मागणीमुळे ही खरेदी केली जात आहे. नामांकित एमएनसी ब्रॅन्डेड मे. हर्मन मिलर, मे. गोदरेज आणि स्टीलकेस या उत्पादित कंपनी किवा त्यांचे अधिकृत वितरक असावेत. आयुक्तांच्या आदेशानुसार ही अट घालण्यात आली आहे. निविदा प्री-बीड मिटींगमधील विविध कंपन्या यात सहभागी झाल्या होत्या. पण त्यांच्या सूचना अमान्य केल्या आहेत. या निविदेवर तक्रारीबाबत आयुक्त हेच निर्णय घेतील.
>
> **- निलेश भदाणे, उपायुक्त, भांडार विभाग, महापालिका**

# आठवीपर्यंत ढकलपास कायमस्वरूपी बंद!

## पास होण्यासाठी पाचवीच्या विद्यार्थ्यांना प्रत्येक विषयात किमान 18 तर आठवीच्या विद्यार्थ्यांना 21 गुणांची अट; 20 वर्षे जतन करून ठेवाव्या लागणार उत्तरपत्रिका

**पिंपरी | प्रतिनिधी**

अंतिम सत्र परीक्षेत पाचवी आणि आठवी या दोन्ही वर्गातील विद्यार्थ्यांना उत्तीर्ण व्हावेच लागणार आहे. पाचवीच्या विद्यार्थ्यास प्रत्येक विषयात किमान १८ तर आठवीच्या विद्यार्थ्यास किमान २१ गुण मिळाले तरच तो उत्तीर्ण ग्राह्य धरला जाणार आहे.

अंतिम सत्र परीक्षेत पाचवी आणि आठवी या दोन्ही वर्गातील विद्यार्थ्यांना उत्तीर्ण व्हावेच लागणार आहे. पाचवीच्या विद्यार्थ्यास प्रत्येक विषयात किमान १८ तर आठवीच्या विद्यार्थ्यास किमान २१ गुण मिळाले तरच तो उत्तीर्ण ग्राह्य धरला जाणार आहे. अंतिम सत्र परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या या दोन वर्गातील विद्यार्थ्यांना उन्हाळा सुटीत संबंधित विषय शिक्षकाने अतिरिक्त अध्यापन करून त्याची जूनमध्ये फेरपरीक्षा घ्यायची आहे. त्यात तो उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे, अन्यथा त्यांना त्याच वर्गात बसावे लागणार आहे.

पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात ढकलपास करण्याची पद्धत आता बंद झाली आहे. त्या विद्यार्थ्यांची परीक्षा नेहमीप्रमाणेच होईल. पण अंतिम सत्र परीक्षेत दोन्ही वर्गातील विद्यार्थ्यांना उत्तीर्ण व्हावेच लागणार आहे. पाचवीच्या विद्यार्थ्यास प्रत्येक विषयात किमान १८ तर आठवीच्या विद्यार्थ्यास किमान २१ गुण मिळाले तरच तो उत्तीर्ण होणार आहे.

राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण संस्थेच्या आदेशानुसार पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ५ ते २५ एप्रिल या काळात होणार आहे. पण, अन्य विद्यार्थ्यांप्रमाणे पाचवी आणि आठवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना सरसकट पास करता येणार नाही. अंतिम सत्र परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या या दोन वर्गातील विद्यार्थ्यांना उन्हाळा सुटीत संबंधित विषय शिक्षकाने अतिरिक्त अध्यापन करून त्याची जूनमध्ये फेरपरीक्षा घ्यायची आहे. त्यात तो उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे, अन्यथा त्यांना त्याच वर्गात बसावे लागणार आहे.

पण, अनेकदा काही शिक्षक पुढील उठाठेव नको म्हणून तोंडी परीक्षेत १० पैकी १० गुण देतात आणि लेखी परीक्षेला तो विद्यार्थी पास होईल इतके गुण देतात, अशीही चर्चा आहे. मात्र, माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी अचानकपणे संबंधित शाळेतील विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासल्यास त्या विषय शिक्षकावर कारवाई होऊ शकते. तसेच पाचवी आणि आठवीच्या विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका यापुढे २० वर्षे जतन करून ठेवाव्या लागणार आहेत.



### उत्तीर्ण होण्याचे समीकरण असे

» पाचवी : १० गुणांची तोंडी तर ४० गुणांची लेखी परीक्षा होते. पाच विषयांची एकूण २५० गुणांची परीक्षा होईल. प्रत्येक विषयात किमान १८ गुण पडलेला विद्यार्थी उत्तीर्ण होतो.

» आठवी : १० गुणांची तोंडी आणि ५० गुणांची लेखी परीक्षा होते. या विद्यार्थ्यांना एकूण सहा विषय असतात. प्रत्येक विषयात उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थ्यास किमान २१ गुण आवश्यक असतील.

### उत्तरपत्रिकांची होणार अचानक पडताळणी

» नाव न सांगण्याच्या अटीवर एका शिक्षण अधिकाऱ्याने सांगितले, “पाचवी आणि आठवीच्या सरसकट विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात ढकलण्याची पद्धत बंद झाली असून त्या विद्यार्थ्यांची परीक्षा पारदर्शकपणे पार पडावी, अशा सूचना सर्व मुख्याध्यापकांना दिल्या आहेत. त्यांच्या उत्तरपत्रिका २० वर्षे जतन करून ठेवाव्या लागणार असून अचानकपणे कोणत्याही शाळेतील विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिकांची पडताळणी केली जाणार आहे.”

> आता इयत्ता पाचवी व आठवीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा झाल्यावर त्यांची प्रश्नपत्रिका व उत्तरपत्रिका शाळांनी जतन करून ठेवणे बंधनकारक आहे. त्या उत्तरपत्रिका, प्रश्नपत्रिकांची फेरतपासणी शिक्षणाधिकारी व जिल्हा शैक्षणिक प्रशिक्षण संस्थेचे (डाएट) अधिकारी करतील. तसे आदेश त्यांना दिले आहेत.
>
> - राहुल रेखावार, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

# एमएसआरडीसीकडून त्या 117 गावांचा पुन्हा विकास आराखडा

## पीएमआरडीए हद्दीतील 117 गावांसाठी नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची नियुक्ती करण्यात आली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील ११७ गावांसाठी नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची (एमएसआरडीसी) नियुक्ती करण्यात आली आहे. पीएमआरडीएने या गावांचा विकास आराखडा तयार केला असून त्यावर आलेल्या हरकतींवर सुनावणीही घेतली आहे. हा आराखडा आता मान्यतेच्या प्रतिक्षेत आहे, असे असतानाही एमएसआरडीसीने या गावांचा पुन्हा नव्याने विकास आराखडा (डीपी) करण्याचे काम हाती घेतले आहे.

रिंगरोडच्या दोन्ही बाजूस एक किलोमीटरच्या अंतरातील ११७ गावांच्या म्हणजे ६६८ चौरस किलोमीटर परिसराच्या विकासाचे अधिकार राज्य सरकारने ‘एमएसआरडीसी’ला दिले आहेत. त्यासाठी ‘विशेष नियोजन प्राधिकरण’ म्हणून महामंडळाला दर्जा देण्यात आला आहे. महामंडळाकडून या ११७ गावांचा विकास आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, त्यासाठीचा इरादा जाहीर करण्यात आला आहे. येत्या आठ महिन्यात प्रारूप आराखडा महामंडळाकडून तयार करण्यात येणार आहे. त्यांनतर पुन्हा तो नागरिकांच्या हरकती-सूचनांसाठी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. त्यावर सुनावणी घेऊन तो अंतिम मान्यतेसाठी शासनाकडे पाठविला जाणार आहे, अशी माहिती एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी दिली.




### या गावांचा पुन्हा होणार विकास आराखडा

» हवेली – गोगलवाडी, माळखेड, मांडवी खुर्द, मांडवी बुद्रुक, खडकवाडी, माणेरवाडी, खानापूर, थोपटेवाडी, गोरे खुर्द, गोरे बुद्रुक, आगळंबे, जांभळी, भगतवाडी, घेरा सिंहगड, डोणजे, वांजळेवाडी, खाडेवाडी, बहूली, सोनापूर, वरदाडे, संभारेवाडी, खामगाव मावळ, मोगरवाडी, कुडजे, मोकरवाडी

» भोर – भांबवडे, भोंगवली, धनगवाडी, गुणंद, केंजळ, खडकी, मोरवाडी, न्हावी, निधन, निगडे, पांदे, पांजळवाडी, राजापूर, सांगवी खुर्द, सारोळे, सावर्दरे, तपरेवाडी, उंबरे, वाठार खुर्द, वाघजवाडी, देगाव, दिडघर, जांभळी, कंबारे, कंजाळे, करांदी, केटकवणे, खोपी, कोळवाडी, कुरुंगवाडी, कुसगाव, माळेगाव, परवडी, रांजे, सालवडे, सांगवी बुद्रुक, सोनवाडी, विरवाडी

» पुरंदर – कोडित खुर्द, पूर, पोखर, वारवाडी, कुंभोशी, सोमुर्डी, घेरापुरंदर, सुपे खुर्द, मिसळवाडी, थापेवाडी, भिवरी, भिवडी, बहीरवाडी, भोपगाव, पाथरवाडी, पिंपळे, पानवडी, हिवरे, कोडित बुद्रुक, अस्करवाडी, चांबळी, बोरहळेवाडी, गारडे

» मुळशी – मुठा, बोतरवाडी, आंदगाव, खारावडे, साईव खुर्द, काटवडी, डावजे, माळेगाव, वाजले, वातुंडे, जातेडे, चिंचवड, कोंढूर, चिखली बुद्रुक, बेलावडे, दरवळी, भरेकरवाडी, मोरेवाडी, विठ्ठलवाडी, टेमघर, खेचरे, मारणेवाडी, कोंढावळे

» वेल्हे – वरसगाव, कुरण बुद्रुक, मोसे बुद्रुक, साईव बुद्रुक, ओसाडे, निगडे मोसे